# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/२०२५ दि. ९ जानेवारी, २०२०

जळगाव दि.९ ( प्रतिनिधी) :- विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष प्रा.एम जगदीश कुमार हे बुधवारी सकाळी विद्यापीठाच्या निसर्गरम्य परिसरात रमले. विद्यार्थ्यांनी सादर केलल्या आदिवासी नृत्याचा आनंद त्यांनी घेतला. गांधी टेकडी, प्रशाळेतील प्रयोगशाळांना भेटी तर दिल्याच पण संशोधक विद्यार्थ्यांशी संवाद साधुन संशोधनाच्या टिप्सही त्यांनी दिल्या. ग्रामीण व आदीवासी भागातील या विद्यापीठाचे शैक्षणिक काम उत्तमरित्या सुरु असल्याबद्दल त्यांनी कौतुकाची थापही दिली.

विद्यापीठाच्या दीक्षांत सोहळयासाठी प्रा.जगदीश कुमार हे दि. ८ जानेवारी रोजी विद्यापीठात आले होते. या सोहळयाआधी त्यांनी सकाळीच विद्यापीठात फेरफटका मारला. गांधी टेकडीला त्यांनी प्रारंभी भेट दिली. यावेळी त्यांच्यासमोर विद्यापीठाच्या समाजकार्य विभागाच्या विद्यार्थ्यांनी आदिवासी नृत्य व गीत सादर केले. या विद्यार्थ्यांसोबत छायाचित्र काढुन या कलावंतांचे प्रा.एम.जगदीशकुमार यांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे संयोजन डॉ.जयेंद्र लेकुरवाळे, प्रा.के.एफ.पवार व प्रा.वर्षा पालखे यांनी केले.

ि प्रा.एम.जगदीशकुमार यांनी विद्यापीठातील स्कुल ऑफ फिजीकल सायन्सेस येथे भेट दिली. त्यावेळी १०००० क्लिन रुम या प्रयोगशाळेची पहाणी करुन विद्यापीठाच्या या उपलब्धीबद्दल संशोधनाचे कौतुक केले. तसेच मोबाईल सायन्स व्हॅनची माहिती त्यांना यावेळी देण्यात आली. त्यावेळी विद्यार्थी विद्यार्थिंनीशी त्यांनी संवाद साधला.

विद्यापीठ विश्रामगृहाच्या हिरवळीवर संशोधक विद्यार्थ्यांशी त्यांनी गप्पा मारल्या. विद्यार्थ्यांकडे पठनम्, मननम्,चिंतनम्,संकेतम् हे चार गुण असतील तर ते चांगले संशोधक होऊ शकतात. भारताला संशोधनाच्या क्षेत्रात अग्रस्थानी ठेवावयाची असेल तर चांगल्या शिक्षकांची आवश्यकता आहे. संशोधक विद्यार्थ्यांनी शिक्षकी पेशाकडे वळून भारताची भविष्यातील पिढी घडवावी. असे आवाहन त्यांनी केले. संशोधक विद्यार्थ्यांच्या शंकांचे त्यांनी निरसन केले.

या भेटीत त्यांच्यासमवेत कुलगुरु प्रा. व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता प्राचार्य एस.एस.राजपुत, मानवविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा.डॉ.जगदीश पाटील, प्रा.समीर

नारखेडे,प्रा.के.एस. विश्वकर्मा, प्रा.प्रवीण पुराणीक, प्रा.एस.आर.चौधरी,प्रा.जे.व्ही.साळी,प्रा.संजय घोष आदी उपस्थित होते.

**बातमी क्र. २**

जळगाव दि.९ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमातर्गत पी.एम.श्री.केंद्रीय विद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी वाचन कौशल्य कार्यशाळा घेण्यात आली.

प्राचार्य सोना कुमार, यांनी पुस्तक वाचनावर विद्यार्थ्यांनी भर द्यावा असे आवाहन केले. यावेळी ज्ञानस्तोत केंद्राचे प्रभारी संचालक विजय आहेर, विद्या हिवराळे, निरज धनकड, धर्मेंद्रसिंग आदी उपस्थित होते.

**बातमी क्र. ३**

जळगाव दि.९ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा.अनिल डोंगरे यांचे शिक्षणाचे महत्व या विषयावर व्याख्यान झाले.

यावेळी प्रशाळेचे संचालक प्रा.म.सु.पगारे अध्यक्षस्थानी होते. प्रा.डोंगरे म्हणाले की शिक्षणाचा उद्देश केवळ लिहीता, वाचता येणे किंवा पदवी घेऊन नोकरी मिळवणे इतका मर्यादित नसुन सुशिक्षीत व सुसंस्कृत होणे असा आहे. जन्मजात आलेले गुण, अनुभव आणि कौशल्य यांचा योग्य वापर शिक्षणाने साध्य करता येतो असे ते म्हणाले. प्रा.म.सु.पगारे यांनी शिक्षणाच्या माध्यमातून व बौध्दिक विकासातून नैतिक मूल्यांची पेरणी झाली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी डॉ.सुदर्शन भवरे,कृष्णा संदानशिव यांनी चर्चेत भाग घेतला. प्रतिभा गलवाडे यांनी सुत्र संचालन केले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनंसपर्क अधिकारी